चंद्रपूर येथे सैनिकी शाळेसाठी नवीन वाहन खरेदी करण्यासाठी निधी वितरीत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
शासन निर्णय क्र. चंसैशा - २०१९/ प्र.क्र. ११/ एसएम-६
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ जुलै, २०१९

संदर्भ : १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. पूरक-२०१९/प्र.क्र.९३/अर्थ-३, दिनांक ०९.०७.२०१९
३) शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक चंसैशा - २०१९/ प्र.क्र. ११/ एसएम-६, दिनांक ११.०७.२०१९

प्रस्तावना :

चंद्रपूर सैनिक शाळा जुन २०१९ कार्यान्वित झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी दि. २४.१.२०१९ च्या पत्रान्वये चंद्रपूर सैनिक शाळेसाठी खालील वाहने खरेदीचा प्रस्ताव सादर केला आहे.

अ.क्र.	वाहनाचे नाव	खरेदी करावयाच्या वाहनांची संख्या
१.	Staff Car (Innova)	०१
२.	Ambulance	०१
३.	Water Tanker	०१
४.	Truck/ Mini Vehicle	०१
५.	५० Seater Bus	०१
६.	Motor Cycle (Enfield Bullet)	०१

२. चंद्रपूर सैनिक शाळेसाठी एकूण ६ वाहने खरेदी करण्यासाठी रु. १२३.२४ लक्ष इतक्या किंमतीच्या खर्चास संदर्भ क्र. (३) येथील दिनांक ११.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. चंद्रपूर सैनिक शाळेसाठी उपरोक्त नमूद एकूण ६ वाहने खरेदी करण्यासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

चंद्रपूर सैनिक शाळेसाठी रु. १२३.२४ लक्ष इतक्या किंमतीच्या मर्यादेमध्ये एकूण ६ वाहने खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या रु. १२३.२४ लक्ष (रुपये एक कोटी तेवीस लक्ष व चोवीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. यासंदर्भात संदर्भ क्र. (३) येथील शासन निर्णय, दिनांक ११ जुलै,२०१९ मधील अटी व शर्तीचे पालन होणे आवश्यक राहील.

३. सदर खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सदर खर्च "मागणी क्रमांक ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण-११०, अशासकीय माध्यमिक शाळांना सहाय्य (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान (२२०२०४६९), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर निधी वितरीत करण्यासाठी आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना "नियंत्रक अधिकारी" तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी कामाबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करावा व याबाबत महालेखापाल कार्यालयाशी ताळमेळ करुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.

५. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शक सूचनांचे, तसेच वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दिनांक ०१.०४.२०१९ व क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकातील आदेशांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२५१६४४०२८०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.07.25 16:49:07 +05'30'

(स्वाती म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मुख्यमंत्री सचिवालय यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ३२
२. सर्व विधान सभा /विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मुख्य सचिव यांचे उप सचिव
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर,
१०. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. विभागीय शिक्षण उप संचालक,नागपूर विभाग, नागपूर
१३. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर
१४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर,
१५. प्राचार्य, सैनिक स्कूल, चंद्रपूर
१६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर
१७. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर

१८. कक्ष अधिकारी , (व्यय ५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१९.कक्ष अधिकारी(अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

२०. निवडनस्ती.

प्रत माहितीसाठी-

१. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२

२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई ३२

३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई ३२